*महाराष्ट्र राज्यात 'राष्ट्रपती राजवटी' ची गरज *

दि० २३/१२/२०२१

.प्रति

. मा. श्री. भगतसिंह कोश्यारीजी,

महामहिम राज्यपाल साहेब राजभवन मुंबई......

राज्यपालांचे सचिवालय, राजभवन
मुंबई - ४०० ०३५
पत्र प्राप्त झाले
23 DEC 2021
स्वाक्षरी
दूरध्वनी क्र. ०२२-२३६३२३४३

.अर्जदार:

: सतीश काशिनाथ खिलारी

मु. पो. करगणी ता. आटपाडी

जि. सांगली पिन कोड:415 306

ई-मेल : satishkhilari81@gmail. Com

विषय: महाराष्ट्रातील मुंबई/ कुलाबा, पुणे आणि कोल्हापूर या सैन्य भरती कार्यालयातून भरती झालेल्या जवानांची रहिवाशी व चारित्र्य प्रमाणपत्रांची पडताळणी मा.केंद्र व मा.राज्य सरकार कडून करवून घेतली जात नसलेने देशाच्या सुरक्षेच्या कारणास्तव मा. सुप्रीम कमांडर ऑफ आर्मड फोर्सेस या जबाबदारी ने मा. राष्ट्रपती, भारत यांनी महाराष्ट्र राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करून यातील दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची आपण मागणी करावी, ही विनंती. ..

महोदय जी,

महाराष्ट्रातील औरंगाबाद या सैन्य भरती कार्यालयामार्फत काही मर्यादित जिल्ह्याकरिता सन 2015 साली सैन्य भरती प्रक्रियेसाठी सहभागी झालेल्या हजारो तरुणांपैकी 1050 तरुणांची अंतिम निवड करणेत आली. प्रक्रिया पूर्ण झाल्यावर भरती मुख्य अधिकारी मा. कर्नल साहेब श्री. मोहनपाल रामपाल सिंह यांना यातील काही उमेदवारांच्या रहिवाशी कागदपत्रांविषयी संशय आल्याने त्या संबंधित कार्यालयाकडून त्याची पडताळणी केली असता ती बनावट असलेचे त्यांना समजल्यामुळे त्यांनी एकूण 43 उमेदवाराविरुद्ध प्रथम खबर अहवाल क्र.189/2016 अन्वये त्यांचेविरुद्ध छावणी पोलीस ठाणे औरंगाबाद येथे **शासनाची फसवणूक केली** या कारणाने गुन्हा दाखल केला.

एकूण 43 पैकी महाराष्ट्रातून असणारे 42 उमेदवार हे सांगली जिल्ह्यातील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सांगली येथे एफ-7799 या क्रमांकाने नोंद असणाऱ्या पोलीस व सैन्य भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र यासाठीच्या आदर्श करिअर अकॅडमी, बहाद्दूरवाडी ता. वाळवा जि. सांगली या प्रसिद्ध ट्रस्ट चे प्रशिक्षणार्थी होते. या ट्रस्ट च्या पदाधिकाऱ्यांचे मुंबई, पुणे व कोल्हापूर या भरती कार्यालयांच्या भरती अधिकाऱ्यांशी संबंध असल्यामुळे **भ्रष्टाचाराकरिता पैसे देऊन** आजवर किमान 500 पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थ्यांना बनावट/ खोट्या रहिवाशी व चारित्र्य प्रमाणपत्राने यशस्वी भरती केले आहे. याकरिता त्यांच्यासह किमान 5000 पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थ्यांना त्यांनी खोट्या / बनावट कागदपत्रांचा पुरवठा केलेला असून त्यामुळे योग्य जिल्ह्यातील पात्र तरुणांचे **नुकसान** झाले आहे.

औरंगाबाद येथे दाखल गुन्ह्यातील 15 या क्रमांकाचा आरोपी गणेश रामदास खिलारी हा माझा चुलत भाऊ असून त्याच्या व त्याच्या आई-वडिलांच्या मागणी प्रमाणे भरती झाल्यावर सर्व यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांना ट्रस्ट ला द्याव्या लागणारे 500000/- रुपये मी सहा महिन्याकरिता त्यांना **उसने** पैशाचा व्यवहार म्हणून त्यांच्या समक्ष ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांना दिले होते. जे परत न दिल्यामुळे माझ्या आर्थिक नुकसानीमुळे माझा झालेला गंभीर दुर्धर



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

गाडीचा अपघात याकरिता मी आर्थिक फसवणूकीकरिता त्यांच्या व ट्रस्ट च्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस व सी. बी. आय. येथे गुन्हा दाखल करण्यासाठी मी प्रयत्न करीत आहे. माझ्या तक्रार अर्जांची केलेली सखोल चौकशी ही **उपरोक्त लिहिलेल्या तीन ही सैन्य भरती कार्यालयाच्या भ्ष्टाचारी अधिकाऱ्यांना शोधण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.**

देशाच्या सुरक्षितता करिता सैन्य भरती प्रक्रियेतील भ्ष्टाचार थांबवण्याकरिता केंद्र व राज्य शासन, भारतीय सैन्य कार्यालये, केंद्र व राज्य तपास यंत्रणा येथे मी केलेले कायदेशीर प्रयत्न व महाराष्ट्र राज्यात राष्ट्रपती **राजवटीच्या आवश्यकतेची कारणे पुढीलप्रमाणे:**

संबंधित कार्यालयाशी झालेल्या पत्रव्यवहारामुळे त्यांच्यासोबत आवक-जावक केलेल्या व या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची माहिती....

**.मा. राष्ट्रपती साहेब, भारत:**

यांना मी दिनांक 15 मे 2019 रोजी उपरोक्त तीन ही ए. आर. ओ. च्या ठिकाणी सैन्य भरती वेळेस होणाऱ्या गैरप्रकारांची तक्रार अर्जाद्वारे कल्पना देऊन दोषींवर कारवाई करण्याची विनंती केली होती. अर्जावरील कार्यवाहीबाबत माहिती अधिकार 2005 अन्वये मागितली होती. ती मिळाली नाही. (पान नं H1 ते H4 पहा.)

**मा. पंतप्रधान साहेब, भारत सरकार:**

यांना मी दिनांक 15 मे 2019 रोजी मा. राष्ट्रपती साहेबांप्रमाणेच पुराव्यासह तक्रार अर्ज दिला होता तो त्यांनी **"सैन्य भरती प्रक्रिया ही स्वच्छ व पारदर्शी आहे".** अशा निकषाने निकाली काढला.**सी. बी. आय. येथील गुन्हा नोंद** करण्यासाठी केलेली विनंती मान्य केली नाही. ( पान नं I1 ते I13 पहा.)

**मा. रक्षा मंत्री साहेब, भारत सरकार**

यांना मी दिनांक 16 मे 2019 रोजी वरील दोघांप्रमाणेच तक्रार अर्जाद्वारे दोषींवर कारवाई करण्याची विनंती केली होती. याबाबत ची त्यांनी केलेली कार्यवाही ची प्रक्रिया याची माहिती **सेनाभवन** येथील अधिकाऱ्यांच्या मागणी प्रमाणे माहिती अधिकार अधिनियम 2005 नुसार अर्ज देऊन ही मला ती मिळालीच नाही. **सी. बी. आय. येथे दिलेला तक्रार अर्ज त्यांनी त्यांच्या कार्यालयातून 'एनक्लोज' करुन रक्षा मंत्रालयातील एका अधिकाऱ्याकडे ट्रान्सफर केला परंतु यावर त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया मला कळविली नाही.** ( पान नं J1 ते J12व पान नं A17 ते A18 पहा.)

**मा. लष्कर प्रमुख, भारत.**

यांना मी दिनांक 28 ऑक्टोबर 2020 रोजी दोषी सैनिकांविरुद्ध पुराव्यासह तक्रार करून त्यांचेवर कारवाई करण्याची विनंती केली होती. याबाबत ची अधिक माहिती मा. महासंचालकसो सैन्य भरती कार्यालय, नवी दिल्ली.येथील कार्यालयातून पत्राद्वारे मला मागितली होती जी मी **तोंडी** स्वरूपात समक्ष देण्यासाठी गेलो असता मला संबंधित अधिकाऱ्यानी **प्रत्यक्ष भेट** दिली नाही व ती मिळण्यासाठी मी National Security Advisor **मा. श्री. अजित डोभाळ** यांचेकडे केलेले प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. ( पान नं K1ते K3 व पान नं L1ते L3 पहा.)

**सैन्य भरती कार्यालये महाराष्ट्र राज्य**



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

मा. महासंचालकसो सैन्य भरती कार्यालय, नवी दिल्ली यांना दोषी सैनिकांची हवी असणारी लेखी स्वरूपातील माहिती मिळवण्यासाठी मी ए. आर. ओ. औरंगाबाद व कोल्हापूर तसेच झेड. आर. ओ. पुणे येथे माहिती अधिकार अन्वये पत्र व्यवहार केले परंतु थर्ड पार्टीला ही माहिती देता येणार नाही या कारणाच्या निमित्ताने मला ती माहिती त्यांनी दिली नाही. औरंगाबाद येथील उपरोक्त कर्नल साहेबांनी दाखल केलेल्या गुन्ह्यातील आजवर अटक न झालेले सहा आरोपी अटक करण्यासाठी चे कोणतेही प्रयत्न  ए. आर. ओ. औरंगाबाद या कार्यालयाने आजवर केलेच नाहीत. ( पान नं M1 ते M21 पहा.)

**मा.महासंचालकसो सी. बी. आय., नवी दिल्ली.**

माझे नातेवाईक, आर्थिक व्यवहाराचे मध्यस्थी व आदर्श करिअर अकॅडमी ट्रस्ट चे पदाधिकारी यांचे विरुद्ध माझ्या आर्थिक फसवणूकी बाबत केलेला तक्रारी अर्ज ट्रस्ट मार्फत बेकायदेशीर रित्या भरती झालेल्या जवानांची शृंखला, भ्रष्टाचारी सैन्य भरती अधिकारी व बनावट कागदपत्रे बनवणारी टोळी यांचा तपास करण्यासाठी अतिशय योग्य असल्यामुळे मी येथे गुन्हा दाखल करण्यासाठी अनेक पाठपुरावे केले परंतु त्यांनी माझा अर्ज मा. रक्षामंत्री कार्यालयाकडे ट्रान्सफर करून एफ. आय. आर. बाबत नकार दिला. ( पान नं A1 ते A18 पहा.)

**महाराष्ट्रातून सैन्य भरती वेळी होत असणाऱ्या गैरप्रकाराकडे केंद्र शासन व प्रशासन यांचे होत असणारे दुर्लक्ष यामुळे देशाच्या सुरक्षा व्यवस्थेवर होणारा गंभीर परिणाम व स्व हक्काच्या जागी भरती होऊन सैन्य सेवा करू इच्छिणाऱ्या** तरुणांवर होणारा अन्याय हा प्रकार थांबवण्यासाठी मी मा.महाराष्ट्र राज्य शासन व प्रशासन यांचेकडे केलेले प्रामाणिक प्रयत्न.....

**मा. राज्यपाल साहेब, मा. मुख्यमंत्रीसो, मा. कॅबिनेट मंत्रीसो (सर्व ) मा.राज्यमंत्री सो (सर्व) मा. विरोधी पक्ष नेतेसो विधानसभा व विधानपरिषद <u>महाराष्ट्र राज्य.</u>**

मा राज्यपाल साहेब, आपल्या सोबत या सर्वांना मी पत्र संवादाद्वारे केंद्र शासन व प्रशासन येथील मी केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण कल्पना देऊन मा. उच्च न्यायालयाच्या देखरेखखाली वरील तीन ही ए. आर. ओ. द्वारे भरती झालेल्या सर्व सैनिकांच्या रहिवाशी व चारित्र्य प्रमाणपत्रांची पडताळणी करवून घ्यावी व दोषी च्या तपासाकरिता माझा सी. बी. आय. येथील गुन्हा दाखल करण्यासाठी सहकार्य करावे, अशा माझ्या दोन्ही विनंत्या महाराष्ट्र शासन व प्रशासन यांनी फेटाळल्याचे पुरावे...

मा. मुख्यमंत्री साहेब यांच्या कडे असणाऱ्या 'विधि व न्याय विभागाने' माझ्या अर्जाबाबतची कार्यवाही 'सामान्य प्रशासन' व 'गृह' विभागाशी संबंधित असल्याचे मला पत्राद्वारे कळविले.

**मा. सामान्य प्रशासन विभाग,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.**

या विभागाने माझ्या कागदपत्रे पडताळणी बाबतचा अर्ज मा. संचालकसो सैनिक कल्याण विभाग, पुणे. यांचेकडे पाठवला जो त्या कार्यालयाशी अजिबात संबंधित नाही. माहिती अधिकार अधिनियम 2005 ने मागवलेल्या



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

माहितीच्या उत्तरात मा. संचालकसो सैनिक कल्याण विभाग, पुणे यांनी मला उपरोक्त तीनच ए. आर. ओ. कडे जाण्याचा सल्ला दिला.( पान नं 18 ते 23 पहा.)

**मा.गृह विभाग, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई.**

छावणी पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे नोंद असलेल्या उपरोक्त गुन्ह्यातील आजवर अटक न केले गेलेले एकूण सहा पैकी महाराष्ट्राचे असणारे **पाच** आरोपी हे वरील ट्रस्ट चेच प्रशिक्षणार्थी असून त्यांच्या अटक करण्यामुळे त्यांच्या चौकशी तून मी सैन्य भरती प्रक्रियेवर केलेले आरोप सिद्ध होत असल्याने मी त्यांच्या अटकेसाठी प्रयत्न करीत होतो. परंतु भारतीय सैन्य व्यवस्थेच्या कमिशन्ड अधिकाऱ्याने पुराव्याने दाखल केलेल्या गुन्ह्याच्या आरोपीना अटक करण्यासाठी महाराष्ट्र शासन व प्रशासनाकडे वारंवार विनंती करूनही मला न मिळालेले यश हे आपल्या राज्याच्या मनमानी शासन व्यवसाथेचा व भ्रष्ट पोलीस प्रशासन व्यवस्थाचा पुरावा आहे.

**मा. गृह विभाग, कार्यालय:**

या कार्यालयाने सैन्य भरती घोटाळ्याबाबतचा माझा अर्ज कार्यवाही करिता मा. पोलीस महासंचालकसो, महाराष्ट्र राज्य यांचेकडे पाठविला.

**मा. पोलीस महासंचालकसो, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

या कार्यालयाने माझा अर्ज पुढील कार्यवाहीकरिता मा. पोलीस आयुक्तसो औरंगाबाद शहर यांचेकडे पाठविला.

**मा. पोलीस आयुक्तसो, औरंगाबाद शहर**

छावणी पोलीस ठाणे, औरंगाबाद येथील पोलीस व पोलीस अधिकाऱ्यांमार्फत उर्वरित **सहा** आरोपींना अटक करण्यासाठी आपल्या अधीकारांचा वापर मा. पोलीस आयुक्तसो यांनी केला नाही.

**मा. पोलीस निरीक्षकसो, छावणी पोलीस ठाणे औरंगाबाद.**( पान नं **43** व **44** पहा.)

अ) एफ. आय. आर.189/2016 यातील कोणत्याही आरोपीस अटक करण्यासाठी यांनी प्रयत्न केलेला नाही.
आ) ट्रस्टच्या अध्यक्षासोबत पोलीस ठाण्यात आलेल्या **सदतीस** आरोपीना अटक करवून त्यांनी सांगितलेला जबाब ऐकून त्यांचे दोषारोप पत्र तयार केले ज्यामध्ये ट्रस्टच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याचे नाव नाही.
इ) उर्वरित **सहा** आरोपी व जबाबानुसार त्याना खोट्या कागदपत्राचा पुरवठा करणाऱ्या **दोन** व्यक्ती यांचे पत्ते माहित असुनही त्यांना अटक केली नाही.
ई) वरिष्ठ केंद्रीय अधिकाऱ्यांनी ठोस पुराव्यासह दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोपीना अटक करण्यासाठी माझ्याकडून पुरावे हवे असल्याची अट **अनाकलनीय** आहे.

**मा. सहाय्यक पोलीस फौजदार,आष्टा पोलीस ठाणे.**( पान नं **45** ते **48** पहा )

मा. मुख्यमंत्रीसो व मा. विशेष पोलीस महानिरीक्षकसो, कोल्हापूर यांचेकडून सैन्य भरती घोटाळ्याचा माझा तक्रार अर्ज कार्यवाही करिता यांचेकडे गेला असता माझी आर्थिक फसवणूकीची तक्रार ही फौजदारी स्वरूपाची



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

नसून दिवाणी स्वरूपाची आहे, अशा आशयाने निकाली काढली.आदर्श करिअर अकॅडमी च्या पदाधिकाऱ्यांनी त्याना सांगितलेल्या माहितीनुसार माझा चुलत भाऊ हा त्या ट्रस्ट चा प्रशिक्षणार्थी होता व एक लाख नव्वद हजार रुपये चा पदाधिकाऱ्यासोबत धनादेशाने झालेला व्यवहार हा वैयक्तिक नसून ट्रस्ट च्या बाबतीतच घडलेला असल्याचा पुरावा शेकडो तरुणांचे आयुष्य व भविष्य ट्रस्टने उद्ध्वस्त केलेचा पुरावा आहे.

माननीय महोदय जी,

आपल्या देशाची सुरक्षितता ही सीमा व देशांतर्गत सुरक्षा व्यवस्थेवर अवलंबून असून तेथील कार्यरत देशवासियांच्या कागदपत्रांची पडताळणी होणे, अतिशय गरजेचे आहे. भ्ष्टाचारामुळे खोट्या कागदपत्राने सैन्यात भरती झालेला परदेशी व्यक्ती देशाला खुप मोठया अडचणीत टाकू शकतो. उदा. आन्विक शस्त्र नियंत्रण क्षेत्रात काम करणारा, खोट्या कागदपत्राने भरती झालेला परदेशीं व्यक्ती आपल्या देशाच्या करू शकणाऱ्या नुकसानी चा विचार सुद्धा न केलेला बरा. सैन्य भरती प्रक्रियेवर मी करीत असलेले आरोप पूर्णतः खरे असून ते खोटे ठरल्यास मला भोगाव्या लागणाऱ्या परिणामांची मला पुरेपूर जाणीव आहे.

तरी मी आपणास विनंती करतो की,

आपल्या राज्यातील सैन्य भरती प्रक्रियेवेळेस होणाऱ्या गैरकारभाराकडे केंद्र व राज्य सरकारचे दुर्लक्ष मा. राष्ट्रपती साहेबांना कळवून उपरोक्त ए. आर. ओ. च्या. यशस्वी भरती सर्व सैनिकांची रहिवाशी व चारित्र्य प्रमाणपत्रांची पडताळणी करवून दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. याकरिता सहाय्य करण्यासाठी माझा सी. बी. आय. येथील तक्रार अर्ज गुन्हा स्वरूपात दाखल करावा.

कळावे,

(भिमारी सतोश काशीनाथ)



Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

## ••• महाराष्ट्र राज्यात राष्ट्रपती राजवटीची आवश्यकता •••

***पुरवणी ***

..

.

प्रती,

मा. भगतसिंह कोश्यारी जी

**महामहीम राज्यपालसो, महाराष्ट्र राज्य.**

राजभवन, मुंबई.

. अर्जदार:

. सतीश काशिनाथ खिलारी.

. मु. पो. करगणी ता. आटपाडी जि. सांगली

. पिन कोड : 415 306

. email id. Satishkhilari81@gmail.com

. **विषय:**

. माहिती अधिकार अधिनियम,2005 च्या दि.30 डिसेंबर 2021 च्या अर्जाची माहिती

. **'विहीत'** कालावधीत मला कळविण्याच्या विनंती बाबत.

**संदर्भ:**

1. दिनांक 23 डिसेंबर 2021 रोजी आपल्या राज्यात **'राष्ट्रपती राजवटी'** बाबत आपल्या कार्यालयात दिलेला अर्ज.
2. दिनांक 30 डिसेंबर 2021 रोजी **उपरोक्त** अर्जाविषयी केलेल्या कार्यवाही बाबत चा मा. अ. अ. 2005 चा आपल्या कार्यालय नावे पोस्टाने पाठविलेला अर्ज.
3. दिनांक जानेवारी 2022 रोजी माझ्या यापूर्वी च्या **"राज्य शासनाकडे केलेल्या तक्रार अर्जाविषयी** मा. पोलीस महासंचालकसो, महाराष्ट्र राज्य या कार्यालयातून मला प्राप्त झालेला **'चौकशी अहवाल".**

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

महोदय जी,

मी दि 23 डिसेंबर 2021 रोजी "आपल्या राज्यातील कुलाबा/मुंबई, पुणे व कोल्हापूर या सैन्य भरती कार्यालयातून भरती वेळेस खोटी/ बनावट रहिवाशी व चारित्र्य प्रमाणपत्रे देऊन यशस्वी झालेल्या सैनिकांची पुराव्यासह माहिती केंद्र व राज्य शासनात देऊनही ते दोषींवर योग्य ती कारवाई करत नसलेने राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करणेत यावी", याकरिता आपल्या कार्यालयात अर्ज देऊन दि.30 डिसेंबर रोजी त्यावरील कार्यवाही जाणण्याकरिता मी मा. अ. अ.2005 नुसार चा माहिती अर्ज स्पीड पोस्ट डाक क्र. EM**424619647**IN याने आपणास पोस्टाने पाठविला होता. अर्जासोबत महाराष्ट्र शासनाच्या संबंधित कार्यालयासोबत झालेल्या आवक-जावक पत्र संवादाची काही कागदपत्रे जोडलेली होती. मा. गृह विभागाने माझ्या तक्रार अर्जाबाबत केलेल्या कार्यवाही च्या माहिती नुसार मला मिळालेला **चौकशी अहवाल** मी भ्रष्ट सैन्य भरती व्यवस्थेवर केलेल्या **गंभीर आरोपांना** खरे ठरवण्यास पूरक आहे ....

आदर्श करिअर अकॅडमी, बहादूरवाडी ता. वाळवा जि. सांगली या नावाची ट्रस्ट बनावट कागदपत्रे देऊन भ्रष्टाचाराने त्यांच्या कडील प्रशिक्षणार्थ्यांना सैन्य भरती करते.यातील एक वेळेचा प्रसंग सन 2015 सालच्या औरंगाबाद येथील भरती वेळेस घडला होता. व त्यातील यशस्वी प्रशिक्षणार्थ्याविरुद्ध भरती मुख्य अधिकारी यांनी त्यांनी **शासनाची दिशाभूल करून फसवणूक केली** या आशयाचा गुन्हा 'छावणी पोलीस ठाणे, औरंगाबाद' येथे दि.26 मे 2016 रोजी दाखल केला होता. शासनाच्या फसवणूकीकडे शासनाचेच **लक्ष** वेधून त्यातील गुन्हेगारांवर 'योग्य ती कारवाई करुन आपल्या राज्याची **कायदा व सुरक्षा** व्यवस्था सुरळीत चालवावी', याकरिता मी प्रयत्न करीत आहे.या प्रयत्नाच्या प्रक्रियेचा एक भाग पाहता उपरोक्त ट्रस्ट ज्या आष्टा पोलीस ठाणे, आष्टा च्या अधिकार क्षेत्रात येते तेथील मा. पोलीस अधिकाऱ्यांनी ट्रस्ट च्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या **चौकशीचा अहवाल** पुढील प्रमाणे:

**अहवालातील संशयास्पद व खोट्या पण वास्तविक खऱ्या परिस्थितीच्या माहितीचे वर्णन.**

*अहवालातील माहिती दि. 07 जून 2021 रोजी मा. मुख्यमंत्री व मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा) यांचेकडे मी केलेल्या तक्रार अर्जाविषयी व दि.2 मे 2017 रोजी ट्रस्ट च्या संचालकाला मी वकिलामार्फत पाठवलेल्या नोटीसविषयी आहे.

•अहवालातील माहिती ही ट्रस्ट च्या अध्यक्षांच्या 'जबाबाचे' अवलोकन करून तयार केलेली आहे.

•अध्यक्षाने दिलेल्या जबाबातील माहितीशी ट्रस्ट च्या इतर तीन पदाधिकाऱ्यांची संमती/ सहमती आहे.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

•बनावट कागदपत्रासह सैन्य भरती ठिकाणी जाण्यासाठी प्रवासासाठी बुक केलेल्या म. रा. प. म. च्या इस्लामपूर डेपो च्या बसेस ची बुकिंग करणाऱ्या ट्रस्ट च्या शिवाजी शंकर खोत या नावाच्या उपाध्यक्षाचा जबाब संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी घेतलेला नाही.

•या अर्जामध्ये त्या अहवालामध्ये असणाऱ्या वाक्यांना असेच 'अधोरेखित' केलेले असेल.

1. दिलीप गणपत देसावळे सन 2000 पासून ट्रस्ट चे संस्थापक-अध्यक्ष आहेत म्हणजे ट्रस्ट जुनी व अनुभवी आहे.

2.अकॅडमी मध्ये दरवर्षी अंदाजे 200 ते 250 विध्यार्थी येत जात असतात म्हणजे औरंगाबाद भरती वेळेस ही तितकेच विध्यार्थी तिथे शिकत असावेत.

3. भरती पुर्व प्रशिक्षण कालावधीत मुलाकडून वार्षिक फी भरून जेवणाची,राहणेची व प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते म्हणजे किमान प्रवेश फी तरी प्रवेशादिवशी व वार्षिक फी दर वर्षी घ्यायला हवी होती.

4.ज्यावेळी राज्यात सैन्य भरती प्रक्रिया सुरु असते त्यावेळी **आमच्या मार्फतीने** एस. टी. बुकिंग करून मुले त्याचे नातेवाईक (चुलत भावाच्या भरती प्रक्रियेस मी किंवा दुसरा कोणताही नातेवाईक त्याच्यासोबत भरती करिता केव्हाही व कुठेही गेलेले नाहीत.) व अकॅडमी चे सर जात असतात म्हणजे अनुभवी अकॅडमी च्या सुशिक्षित पदाधिकारी व शिक्षकांना आपण जात असणाऱ्या भरती करिता चे नियोजन, त्याचे प्रसिद्धी पत्रक, तिथे द्यावी लागणारी कागदपत्रे याची माहिती जाणून घेण्याची बौद्धिक क्षमता बस बुकिंग करण्यापूर्वी नक्कीच असेल.

5.सतीश सन 2013 मध्ये त्याच्या चुलत भावास प्रशिक्षणासाठी तिथे घेऊन गेला म्हणजे किमान तेथील अपेक्षित प्रवेश फी तरी मी त्या वेळेस दिलेलीच असेल. **(अकॅडमी येथे प्रवेश घेणाऱ्या 'कोणासही' 'कोणत्याही प्रकारची' फी दिल्याची पावती आजही दिली जात नाही.)**

6. सन 2015 साली औरंगाबाद येथे भारतीय सैन्य भरती प्रक्रियेस एकूण 200 ते 250 विध्यार्थ्यांपैकी 23/07/15 रोजी तीन बस मधून सुमारे 70 ते 75 जण नातेवाईकांसह भरतीसाठी गेले होते पण भरती प्रक्रिया पूर्ण झाली नाही म्हणून परत येऊन 31/07/2015 रोजी पुन्हा 7 बसेसद्वारे 125 ते 150 विध्यार्थी नातेवाईकांसह परत बहादूरवाडी ते औरंगाबाद येथे गेले. अर्जासोबत जोडलेले भरती चे प्रसिद्धी पत्रक पहा ज्यामध्ये तारखेनुसार उपस्थिती आवश्यक असणाऱ्या जिल्ह्यांची माहिती व लागणारी कागदपत्रे याची माहिती सविस्तर लिहिलेली आहे.23 जुलै ला बस ने प्रवास करणाऱ्या विध्यार्थी, त्यांचे नातेवाईक, ट्रस्ट चे पदाधिकारी व शिक्षक यापैकी कोणच शुद्धीत नव्हते का?

7. परंतु अर्जात उल्लेख केले प्रमाणे आमच्या अकॅडमी मधून आम्ही प्रशिक्षण घेणाऱ्या विध्यार्थ्यांना बहादूरवाडी ते औरंगाबाद असे भरती रॅली मध्ये सहभागी होणे करिता आमच्या संस्था संचालकसोबत 200 ते 250 विध्यार्थी गेले होते उपरोक्त **6 क्रमांकाच्या** व या माहितीमधील विध्यार्थी संख्येत तफावत का? म्हणजेच उपरोक्त **2 क्रमांकाच्या** माहितीनुसार अकॅडमी मधील सर्वच विध्यार्थ्यांनी भरती रॅलीत सहभाग घेतला होता.

8.वरील सर्व विध्यार्थी पैकी 35 विध्यार्थ्यांची भारतीय सैन्य भरती प्रक्रियेत पात्र झाल्यामुळे निवड झाली **व** त्यामध्ये आमच्या संस्थेतील 35 विध्यार्थी यांनी चुकीची कागदपत्रे दिल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला याचाच अर्थ उपरोक्त **7 क्रमांकाच्या** च्या माहिती नुसार सर्वच विध्यार्थ्यांची कागदपत्रे चुकीची/ खोटी/ बनावट होती.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

9. सन 2000 पासून आमची अकॅडमी चालू आहे तेव्हा पासून प्रशिक्षणासाठी विध्यार्थ्यांकडून फी सोडून कोणत्याही प्रकारची जादा रक्कम स्वीकारली जात नाही. फक्त आम्ही 2 वर्षासाठी 1,80,000/- फी व 10,000/- ऍडमिशन असे एकूण 1,90,000/- रुपये घेतले जातात त्याप्रमाणे गणेश याचेकरिता सतीश यांनी चेकने माजी संचालक श्री अर्जुन विष्णू खोत यांचेकडे जमा केले, ते आम्हास मिळाले. माझ्या चुलत भावाचा अकॅडमी मध्ये सन 2013 साली प्रवेश झाला होता तर सन 2015 च्या अखेर 28 डिसेंबर रोजी त्याची प्रवेश फी 10,000/-रुपये इतक्या उशिरा का घेतली गेली?. सन 2013 ते डिसेंबर 2015 हा तीन वर्षाचा काळ असताना फी मात्र दोन वर्षाचीच 1,80,000/- का घेतली?

10. ज्यावेळी विध्यार्थी भरती करिता जात असतात त्यावेळी त्यांचे सोबत ते स्वतः त्यांचे कडील पुरावे घेऊन जातात व भरती वेळेस विध्यार्थी सोबत त्यांचे नातेवाईक असतात हा जर ट्रस्ट च्या अध्यक्षाचा जबाब खरा ग्राह्य धरायचा असेल तर पोलीस व न्यायालय कोठडी ही प्रक्रिया करून जामीन मिळण्याच्या प्रक्रियेस अध्यक्ष एकटेच का विध्यार्थ्यांच्या सोबत गेले? नातेवाईक का गेले नाहीत?

## अर्जासोबत जोडलेल्या इतर काही कागदपत्रांबाबत माहिती:

अ) प्रथम खबर अहवाल 189/2016 छावणी पोलीस ठाणे बाबत:

A.फिर्याद मध्ये **शासनाची दिशाभूल करुन फसवणूक केली आहे** असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

B) एकूण 43 आरोपींपैकी आजवर अटक केलेल्या 37 जणांपैकी 35 वरील अकॅडमी चे विध्यार्थी होते याची कबुली वरील जबाबातून स्पष्ट होते.

C) दि.7 ऑक्टोबर 2021रोजी याच पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी मला कळवलेल्या माहितीनुसार उर्वरित 6 आरोपींपैकी 4 हे वरील 37 प्रमाणेच सांगली व कोल्हापूर याच जिल्ह्यातील असून त्यापैकी एक तर ट्रस्ट असणाऱ्या बहाद्दूरवाडी याच गावाचा आहे. म्हणजेच तेही 4 जण अकॅडमीचेच विध्यार्थी असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ब ) माहिती अधिकार अधिनियमाने म. रा. प. म. इस्लामपूर डेपो ने दिलेली माहिती.

A) सर्व बसेस च्या बुकिंग्ज सैन्यभरती कार्यास्तव झालेल्या आहेत.

B) दि.09/06/2015 रोजी 2 बसेस पुण्याजवळील तळेगाव येथे पुणे ए आर ओ च्या भरती मध्ये खोट्या कागदपत्राने यशस्वी भरती झालेल्या तरुणांना घेऊन गेल्या होत्या.

C) दि.31 जुलै 2015 रोजी औरंगाबाद नंतर त्याच सालच्या कुलाबा/ मुंबई या ए आर ओ च्या भरती रॅली करिता 31 ऑगस्ट 2015 पासून रॅली काळात अकॅडमी पासून खोट्या /बनावट रहिवाशी दाखले असणाऱ्या विध्यार्थ्यांना घेऊन तब्बल 19 बसेस गेल्या होत्या. त्यातील यशस्वी विध्यार्थ्यांना घेऊन 2 बसेस 2 वेळेस व 3 बसेस 1 वेळेस कुलाब्यास गेल्या आहेत. ( अकॅडमी ची विध्यार्थी संख्या नक्की किती असावी? औरंगाबाद येथील अयशस्वी विध्यार्थी पुन्हा दुसऱ्या बनावट रहिवाशी प्रमाणपत्रासह तिकडे गेले नसतील का?)

D) 26/5/2016 रोजी छावणी पोलीस ठाण्यातील दाखल झाल्यानंतर दि 7 व 12 सप्टेंबर 2016 रोजी कुलाबा/ मुंबई ए. आर. ओ. च्या नाशिक- देवळाली येथील रॅली करिता एकूण 14 बसेस अकॅडमी पासून गेलेल्या असून त्यातील यशस्वीची संख्या औरंगाबाद पेक्षा जास्त असल्याचे त्यांना घेऊन जाणाऱ्या बसेस संख्या पाहून लक्षात येते. **छावणी पोलीस ठाण्यातील दाखल गुन्ह्यानंतर खोट्या/बनावट कागदपत्राने भरती**

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

झालेल्या जवानांच्या त्या गुन्ह्यास पोलीस ठाण्याच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणास कारणीभूत ठरवता येणार नाही का?

महोदय,

वरील सर्व माहिती पाहता **"बनावट कागदपत्रे असूनही सैन्य भरती" या प्रक्रियेचे खूप मोठे रॅकेट** आपल्याला लक्षात येते ज्याचा सखोल तपास करवून दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई व्हावी, याकरिता मी प्रयत्न करीत आहे.

**तरी आशा करतो की,**

**आपण मी 30 डिसेंबर 2021 रोजी ची आपल्या कार्यालयात माहिती अधिकार अधिनियमाने मागितलेली माहिती शक्य तितक्या लवकर मला कळवून 'मी देशहितार्थ करीत असलेल्या कार्यवाहीच्या पुढील प्रक्रियेसाठी' मला सहकार्य कराल ".**

कळावे,

दिनांक 20 जानेवारी 2022.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

••• महाराष्ट्र राज्यात राष्ट्रपती राजवटीची आवश्यकता •••

*पुरवणी क्र. 2*

दि. 04 फेब्रु.2022

राज्यपालांचे सचिवालय, राजभवन
मुंबई - ४०० ०३५
पत्र प्राप्त झाले
04 FEB 2022
स्वाक्षरी
दूरध्वनी क्र. ०२२-२३६३२३४१

प्रती,

मा. भगतसिंह कोश्यारी जी

**महामहीम राज्यपालसो, महाराष्ट्र राज्य.**

राजभवन, मुंबई.

अर्जदार:

सतीश काशिनाथ खिलारी.

मु. पो. करगणी ता. आटपाडी जि. सांगली

पिन कोड : 415 306

email id. Satishkhilari81@gmail.com

**विषय:**

माहिती अधिकार अधिनियम,2005 च्या दि.30 डिसेंबर 2021 च्या अर्जाची माहिती दि. 15 फेब्रुवारी 2022 पूर्वी मला कळविण्याच्या विनंती बाबत.

**संदर्भ:**

1. दिनांक 23 डिसेंबर 2021 रोजी आपल्या राज्यात **'राष्ट्रपती राजवटी'** बाबत आपल्या कार्यालयात दिलेला अर्ज.
2. दिनांक 30 डिसेंबर 2021 रोजी **उपरोक्त** अर्जाविषयी केलेल्या कार्यवाही बाबत चा मा. अ. अ. 2005 चा आपल्या कार्यालय नावे पोस्टाने पाठविलेला अर्ज.
3. दिनांक 20 जानेवारी 2022 रोजी आपणास स्पीड पोस्ट डाक क्र. EM424648250IN याद्वारे आपणास पाठविलेली माझ्या मुळ अर्जाची पुरवणी क्र.1.
4. सहाय्यक पोलीस आयुक्त, कार्यालय छावणी विभाग, औरंगाबाद शहर यांचेकडून मा. अ. अ.2005 नुसार मला मिळालेली माहिती.

Scanned with CamScanner

. महोदय जी,

मी दि 23 डिसेंबर 2021 रोजी "आपल्या राज्यातील कुलाबा/मुंबई, पुणे व कोल्हापूर या सैन्य भरती कार्यालयातून भरती वेळेस खोटी/ बनावट रहिवाशी व चारित्र्य प्रमाणपत्रे देऊन यशस्वी झालेल्या सैनिकांची पुराव्यासह माहिती केंद्र व राज्य शासनास देऊनही ते दोषींवर योग्य ती कारवाई करत नसलेने राज्यात <u>राष्ट्रपती</u> <u>राजवट</u> लागू करणेत यावी", याकरिता आपल्या कार्यालयात अर्ज देऊन दि.30 डिसेंबर रोजी त्यावरील कार्यवाही जाणण्याकरिता मी मा. अ. अ.2005 नुसार चा माहिती अर्ज स्पीड पोस्ट डाक क्र. EM**424619647**IN याने आपणास पोस्टाने पाठविला होता. अर्जासोबत महाराष्ट्र शासनाच्या संबंधित कार्यालयासोबत झालेल्या आवक-जावक पत्र संवादाची काही कागदपत्रे जोडलेली होती.

मुळ अर्जात आपणास कळविले प्रमाणे माझी तक्रार ही महाराष्ट्र शासनाच्या **सामान्य प्रशासन** व **गृह** विभागाशी संबंधित असलेचे **विधि व न्याय** विभागाच्या एका पत्राद्वारे मला कळविलेले होते. त्यापैकी सामान्य प्रशासन विभागाने स्वतः ची जबाबदारी झटकलेची माहिती असणारी कागदपत्रे मी मुळ अर्जासोबत दिलेली होती. गृह विभागातील अपूर्ण माहिती ही, "मी आरोप करीत असणाऱ्या **आदर्श करिअर अकॅडमी, बहादूरवाडी ता. वाळवा जि. सांगली** ही ट्रस्ट अधिकारक्षेत्रात असणाऱ्या आष्टा पोलीस स्टेशन, आष्टा या पोलीस ठाण्यातून **चौकशी अहवालाद्वारे** मला मिळाली", ती पुरवणी क्र.1 द्वारे आपणास कळविली होती पण उर्वरित माहिती मला कळविण्याकरिता मा. पोलीस महासंचालकसॊ, महाराष्ट्र राज्य यांनी सहा महिन्यापूर्वी निर्देश देऊन ही मा. पोलीस आयुक्त सॊ, औरंगाबाद शहर व त्यांचेशी संबंधित कार्यालयानी **ती 'माहिती' मला देण्याचे 'विनाकारण' व 'जाणीवपूर्वक' टाळल्याने मी 'राज्यात हव्या असणाऱ्या राष्ट्रपती राजवटी करिता' ची पुरवणी क्र.2 या अर्जाद्वारे आपणास कळवितो आहे.**

1. मा.पोलीस महासंचालकसॊ यांचे कार्यालयातून दिनांक 29 जुलै 2021 रोजी 'माझा सैन्य भरती घोटाळ्याबाबतचा अर्ज' कार्यवाहीकरिता मा. पोलीस आयुक्तसॊ, औरंगाबाद शहर यांचेकडे पाठविला. होता. यामध्ये '**केलेल्या कार्यवाही ची माहिती तक्रारदारास व मा. पोलीस महासंचालकसॊ यांना कळवावी' असा स्पष्ट उल्लेख केलेला होता.** परंतु तब्बल सहा महिन्याचा काळ पूर्ण होऊनही कार्यवाही बाबतचा <u>अहवाल</u> मला आजवर कळविलेला नाही.

Scanned with CamScanner

2. दिनांक 29 सप्टेंबर 2021 रोजी **गृह विभागाने दि.03 ऑगस्ट 2021 रोजी च्या संपूर्ण मंत्री मंडळाकडे** केलेला माझा तक्रार अर्ज कार्यवाहीकरिता मा. पोलीस महासंचालकसो यांना दिल्याचे मला पत्राद्वारे कळविले होते. त्याबाबतची गृह विभागास मिळालेली माहिती मला मिळावी, याकरिता **दि.25 ऑक्टोबर 2021** रोजी मा. अ. अ.2005 चा अर्ज केल्यास ती माहिती मा. पोलीस महासंचालकसो यांचे कार्यालयातून उपलब्ध करून घ्यावी, असे मला कळविण्यात आले.
3. **दि.25 ऑक्टोबर 2021** रोजी मा. पोलीस महासंचालकसो, महाराष्ट्र राज्य यांना उपरोक्त **2.** या क्रमांकाची माहिती मला मिळावी याकरिता मा. अ. अ.2005 चा अर्ज केल्यास **ही माहिती मा. पोलीस आयुक्तसो, औरंगाबाद शहर या कार्यालयातून उपलब्ध करुन घ्यावी** असे मला कळविले.
4. दि.15 डिसेंबर 2021 रोजी माझा **दि 25 ऑक्टोबर 2021** चा मा. अ. अ.2005 चा अर्ज छावणी पोलीस स्टेशन, औरंगाबाद शहर याच्याशी संबंधित असल्यामुळे त्यातील माहिती **जन माहिती अधीकारी, सहाय्यक पोलीस आयुक्त, छावणी विभाग, औरंगाबाद शहर** यांनी मला द्यावी याकरिताचे मा. पोलीस आयुक्तसो, औरंगाबाद शहर यांचे पत्र मला मिळाले.
5. **जानेवारी 2021** अशा दिनांकाचे **दि.25 ऑक्टोबर 2021** च्या मा. अ. अ.2005 च्या अर्जाचे मा. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्तसो, छावणी विभाग औरंगाबाद शहर यांचे उत्तर पुढीलप्रमाणे आहे.

**अ.**माहिती अर्जाद्वारे "सन 2015 साली बनावट कागदपत्रे देऊन सैन्य भरती झालेल्या सैनिकांच्या विरुद्ध सैन्य भरती कार्यालय औरंगाबाद येथील मुख्याधिकाऱ्यांनी दि.26 मे 2016 रोजी **शासनाची दिशाभूल करुन फसवणूक केली** या कारणास्तव छावणी पोलीस ठाणे येथे दाखल केलेल्या गुन्ह्यातील आजवर अटक न करू शकलेल्या आरोपीना अटक करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती" मी मागितलेली होती.

**आ.** मा. जन माहिती अधिकारीसो छावणी विभाग औरंगाबाद शहर यांनी मी मागितलेली माहिती देण्यास नकार देण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत, जी माझ्या मते चुकीची आहेत......

**1.**<u>**माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 पोटकलम (त्र) मधील तरतुदीनुसार जी माहिती देणे याचे बंधन माहिती अधिकारी यांचेवर नाही**</u> परंतु मी मागितलेली माहिती 'शासनाची फसवणूक' याबाबतच्या गुन्ह्याच्या आरोपी यांचे विषयी, <u>शासनातीलच</u> एका पदाधिकारी कार्यालयालाच मागितलेल्या माहिती देण्याबाबत, त्या विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने आपल्या खात्याच्या कनिष्ठ अधिकाऱ्यास दिलेल्या निर्देशामुळे/पत्रामुळे मला द्यायची होती.

**2.** <u>**लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी**</u> परंतु देशाच्या सैन्य भरती प्रक्रियेत बनावट कागदपत्रे देऊन भरती झाल्यामुळे दाखल केलेल्या गुन्ह्यातील गुन्हेगारास **व** योग्य रित्या पात्र होऊ शकणाऱ्या तरुणांवर अन्याय करणारास अटक करणेबाबत चा **मी** केलेला पाठपुरावा लोकहितीचा/ जनहिताचा नाही का?

Scanned with CamScanner

3. <u>विशेष त्रयस्थ पक्षाबरोबर उद्भवणाऱ्या वैयक्तिक वादाच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती नाकारण्यात येत आहे</u> परंतु दाखल गुन्ह्यातील आरोपी अटक झाल्यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता कशी काय असू शकते?

**छावणी पोलीस ठाणे, औरंगाबाद येथील दाखल गुन्ह्याबाबत**

- गुन्ह्याच्या एकूण त्रेचाळीस पैकी कोणत्याही गुन्हेगारास संबंधित पोलीस व पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना स्वतः हुन अटक केले नाही.
- उपरोक्त ट्रस्ट च्या अध्यक्षासोबत जाऊन स्वतः अटक झालेल्या सदतीस आरोपीच्या सखोल चौकशीवीना दोषारोप पत्र तयार केलेले असून मुळ आरोपी **मोकाट** राहिल्यामुळे त्यांनी तशाच गुन्ह्यांची पुनरावृत्ती केली आहे.
- एफ. आय. आर. मधील आजवर अटक न झालेले उर्वरित सहा आरोपी व दोषारोप पत्र दाखल झालेल्या सदतीस आरोपीना बनावट कागदपत्रे पुरवणाऱ्या दोन व्यक्ती अशा एकूण आठ जणांच्या रहिवास ठिकाणाची माहिती असूनही संबंधित पोलीस व पोलीस अधिकारी त्यांना अटक करत नाहीत.

**महोदय जी,**

**उपरोक्त माहिती पाहता महाराष्ट्र शासनाच्या 'देशांतर्गत सुरक्षा' कार्यालयाशी संबंधित गैरकारभाराकडे त्याच विभागाच्या शासन व प्रशासन यांचे 'दुर्लक्ष' आपल्या राज्याला असुरक्षित बनवत आहे. उपरोक्त ट्रस्ट मार्फत बनावट कागदपत्राने दरवर्षी सैन्यभरती होणारे <u>गुन्हेगार</u> तरुण हे त्या गुन्ह्याचे मुख्य आरोपी नसून "ट्रस्टमार्फत गैरमार्गाने भरती झालेल्या तरुणांवर कारवाई होत नाही", या परंपरेचे शिकार असल्यामुळे परंपरेला वेळीच आळा घालणे, अत्यंत अत्यंत गरजेचे आहे.**

<u>तरी आपणास विनंती करतो की, माझ्या दि.30 डिसेंबर 2021 च्या मा. अ. अ. 2005 च्या अर्जाचे उत्तर दि.15 फेब्रुवारी 2022 पर्यंत मला कळवावे. केंद्र व राज्य शासनाप्रमाणे 'आपण' ही देशाच्या सुरक्षेविषयीच्या गोष्टी कडे दुर्लक्ष करून 'स्वतंत्र देश पारतंत्र्याकडे' जाऊ देणार नाही,</u> हीच एक आशा....

कळावे,

Scanned with CamScanner

माहितीचा अधिकार

Speed post

EMS SPEED POST

EM226003605IN

**O. I. G. S.**

(५)





प्रती,

श्री. सतिश काशिनाथ खिलारी,
मु.पो. करगणी, ता. आटपाडी.
जि. सांगली - 415306

From :

**Secretary to the Governor of Maharashtra**
**Raj Bhavan, Mumbai 400 035.**

Scanned with CamScanner

Details

Receipt Details

| | | | |
|---|---|---|---|
| Receipt No : | 5035144/2021/RB(CGH) | File No : | |
| From : | Sateesh Khilari | Designation : | |
| Main Category : | Governor MS | Sub Category : | |
| Address : | Kargani, Sangli | Sent Date : | 16/02/22 11:37 AM |
| Letter Ref. No : | | Letter Date : | 23-12-2021 |
| Subject : | महाराष्ट्रातील मुंबई/कुलाबा, पुणे | Enclosures: | |
| Delivery Mode : | By Hand | Sender Type : | |

**Movement Details**

| Sent By | Sent On | Sent To | Action | Remarks | Received On |
|---|---|---|---|---|---|
| SACHIN LAXMAN SHIMGE,RB(CGH) | 16/02/22 11:37 AM | DEEPAK DNYANDEO MANE,HOME-REGISTRY | Forward | | 16/02/22 11:37 AM |

**Receipt Dispatch History**

| Dispatch Number | Subject | Address | Dispatch Date |
|---|---|---|---|

जन माहिती अधिकारी (प्रशासन)
राज्यपालांचे सचिव कार्यालय,
राजभवन, मुंबई–४०० ०३५.

Scanned with CamScanner

माहितीचा अधिकार

क्र.राजभवन-2022/प्रशा/माअ/५१५

# मा.राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय

जन माहिती अधिकारी (प्रशासन), प्रशासन विभाग,
राजभवन, वाळकेश्वर, मुंबई-400 035.
(दूरध्वनी क्र.022-23632343 / ईमेल- usa.rb-mh@nic.in)

१८, फेब्रुवारी, 2022

प्रति,
श्री. सतिश काशिनाथ खिलारी,
मु.पो. करगणी, ता. आटपाडी,
जि. सांगली-415306.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत, आपला दिनांक 30.12.2021 चा माहिती अर्ज(सहपत्रांसह) जन माहिती अधिकारी, मा. राज्यपालांचे सचिव कार्यालय,मुंबई यांचेकडे दि. 25.01.2022 रोजी प्राप्त झाला आहे.

उक्त अर्जान्वये आपण, दि. 23.12.2021 रोजी मा. राज्यपाल कार्यालयास केलेल्या तक्रार अर्जाबाबत व त्यावरील कार्यवाहीबाबत माहिती मागितली आहे.
मुद्दा क्र. अ ची माहिती: आपल्या सदरहू तक्रार अर्जास या कार्यालयाचा ई-प्रणाली क्र. 5035144/2021/RB(ADM) देण्यात आला आहे.

मुद्दा क्र. ब ची माहिती: आपला सदरहू तक्रार अर्ज ई-प्रणाली क्र. 5035144/2021/RB(ADM), दि.16.02.2022 अन्वये गृह विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पाठविण्यात आला आहे. (कार्यवाहीची प्रत सोबत जोडली आहे).

मुद्दा क्र. क ची माहिती: आपला अर्ज पुढील कार्यवाहीसाठी गृह विभागाकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे या मुद्दयाची माहिती उपलब्ध नाही.

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास आपण श्रीमती प्राची जांभेकर, मा. राज्यपालांच्या उप सचिव तथा प्रथम अपिलीय प्राधिकारी (प्रशासन), राज्यपालांचे सचिवालय, राजभवन, वाळकेश्वर, मुंबई-400035, यांचेकडे हे पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत, माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम19(1) अंतर्गत प्रथम अपिल दाखल करु शकता.

आपला,

(जयराज. गो. चौधरी)
जन माहिती अधिकारी व अवर सचिव (प्र.),
राज्यपालांचे सचिवालय, राजभवन

Scanned with CamScanner